क्रमांक:१८९१/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक: ३ फेब्रुवारी, २०२२.

**:: कार्यालयीन आदेश ::**

या सचिवालयातील तात्पुरत्या पदोन्नतीमुळे/प्रतिनियुक्तीमुळे रिक्त झालेल्या एस-१४:३८६००-१२२८०० या वेतनस्तरातील **"सहायक कक्ष अधिकारी"** या पदावर लिपिक-टंकलेखक संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे :-

| अ. क्र. | लिपिक-टंकलेखकाचे नाव |
|---|---|
| १. | श्री.श.ल.बोंबले, लिपिक-टंकलेखक |
| २. | श्री.रा. र. भानजी, लिपिक-टंकलेखक (सद्य:स्थितीत मा.समिती प्रमुख यांचे स्वीय सहायक म्हणून कार्यरत) |
| ३. | श्री.मं. कृ. काबदुले, लिपिक-टंकलेखक |
| ४. | श्री.दि. न. खापरे, लिपिक-टंकलेखक |
| ५. | श्री.प्र. प्र. उत्तेकर, लिपिक-टंकलेखक |
| ६. | श्री.अ. भि.कदम, लिपिक-टंकलेखक (प्रपत्र बढती- मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या आस्थापनेवर लिपिक-टंकलेखक ) |
| ७. | श्री.हे. र. भुर्के, लिपिक-टंकलेखक (सद्य:स्थितीत मा.समिती प्रमुख यांचे स्वीय सहायक म्हणून कार्यरत) |
| ८. | श्री.सु. जा. शेंद्रे, लिपिक-टंकलेखक |
| ९. | श्री.तु. स. जाधव, लिपिक-टंकलेखक |
| १०. | श्री.रा. बा. भांडेकर, लिपिक-टंकलेखक (सद्य:स्थितीत मा.समिती प्रमुख यांचे स्वीय सहायक म्हणून कार्यरत) |
| ११. | श्री.आ. अ. जाधव, लिपिक-टंकलेखक |

..२/-

२. संबंधित कर्मचाऱ्यांना सहायक कक्ष अधिकारी पदावर तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

(अ) सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील पदोन्नत्या तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात येत आहेत.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ सहायक कक्ष अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यानंतर त्यांच्यासाठी सहायक कक्ष अधिकारी संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास, या आदेशातील कनिष्ठतम कर्मचाऱ्याला पदावनत करण्याच्या अधीन सदर तात्पुरत्या पदोन्नत्या देण्यात येत आहेत.

(ड) ज्या कर्मचाऱ्यांना सरळसेवेच्या कोटयातील पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती दिलेली आहे. अशा कर्मचाऱ्यांना सरळसेवेची भरती केल्यानंतर त्यांच्या मूळ पदावर पदावनत करण्यात येईल. तथापि, पदोन्नतीसाठी उपलब्ध असलेल्या कोटयामध्ये जर जागा शिल्लक असतील तर त्यांचा पदोन्नतीच्या कोटयामध्ये समावेश करण्यात येईल.

३. अनुक्रमांक ३ वरील श्री.काबदुले यांना लिपिक-टंकलेखक पदाची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अधीन राहुन सहायक कक्ष अधिकारी या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे. लिपिक-टंकलेखक पदाची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा विहित संधीत उत्तीर्ण न झाल्यास, श्री.काबदुले यांना लिपिक-टंकलेखक पदावर पदावनत करण्यात येईल.

४. अनुक्रमांक ६ वरील श्री.कदम यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ४०, परिशिष्ट-२, अट क्र. १८ नुसार तात्पुरत्या स्वरुपात प्रपत्र बढती (पदोन्नती) देण्यात येत आहे. सदर तरतूदीनुसार प्रपत्र बढतीचा कालावधी हा आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचा राहील. त्यानंतर श्री.कदम यांनी या सचिवालयात हजर होणे आवश्यक राहील.

..३/-

५. अनुक्रमांक ३ व ४ वरील श्री. काबदुले व श्री. खापरे हे अनुक्रमे मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या आस्थापनेवर उसनवार तत्वावर कार्यरत आहेत. श्री.काबदुले व श्री.खापरे यांनी पदोन्नतीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर तात्काळ या सचिवालयाच्या आस्थापनेवर रुजू होऊन रुजू अहवाल सादर करावा.

आदेशानुसार,

**(सुभाष नलावडे)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

**उपरोक्त सर्व संबंधित लिपिक-टंकलेखक.**

**प्रतिलिपी :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

७) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

८) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांनी सदरहू आदेश या सचिवालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत आस्थापना कक्षास आदेश निर्गमित झाल्याच्या तारखेपासून आठ दिवसात कळवावे.

१०) वैयक्तिक नस्ती.

११) निवडनस्ती.